पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा • वर्ष १ • अंक ९५ • शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ • मूल्य ३ • पृष्ठे ४

RNI No.- MAHMAR/ 26 /A3072 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी विचारांसोबतच कठोर परिश्रमाची जोड असणे गरजेचे आहे.




## »थोडक्यात

### सगळं सांभाळून घे दीदी म्हणत भावाने संपविले जीवन!

जळगाव : रक्षाबंधन सणाच्या दिवशीच जळगावमध्ये एक हृदयद्रावक आणि सुन्न करणारी घटना घडली आहे. 'सगळं सांभाळून घे दीदी, मम्मी-पप्पाला एकटं सोडू नको, मी जातो' असा भावनिक मेसेज सोशल मीडियावर बहिणीला पाठवून एका १७ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास घेत आपले आयुष्य संपवले. रोहित धनगर असे या मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. ऑनलाईन गेमिंगमध्ये पैसे हरल्यामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर येत असून या घटनेने जळगावात मोठी खळबळ उडाली आहे.

### समृद्धी महामार्गावर दरोडेखोरांची दहशत!

सिन्नर : समृद्धी महामार्गावर सिन्नर तालुक्यातील मलढोण व दुशिंगपूर शिवारात मध्यरात्री दरोडेखोरांच्या टोळक्याने भयंकर थरार घडवून आणला. लुटारूंनी धावत्या वाहनांच्या मार्गात खिळे व धारदार लोखंडी वस्तू टाकून टायर पंक्चर केले आणि लाखो रुपयांची लुटालूट केली. दीड तासांहून अधिक काळ चाललेल्या या महामार्गावरील धुमाकूळात ३ वाहनांना लक्ष्य करण्यात आले असून वावी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नेपाळ-चीन भूस्खलनानंतर दोन जलाशय तयार

काठमांडू : नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पूर आणि भूस्खलनानंतर दोन नवीन तलाव तयार होण्याचा धोका कायम आहे. एका तलावातून सतत पाणी गळत आहे, तर दुसऱ्या तलावाचा आकार वाढत आहे. आणखी एक पूर किंवा भूस्खलनाच्या शक्यतेबद्दल अधिकाऱ्यांना चिंता वाटत आहे. नेपाळ आणि तिबेटमधील मृतांचा आकडा ५८६ वर पोहोचला आहे.

# राज्यातील जात पडताळणी समित्या बरखास्त करा!

## मनोज जरांगे यांची नवी मागणी, मागण्या मान्य न झाल्यास मुंबईकडे कूच

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अंतरवली सराटी :** राज्यातील जात पडताळणी समित्या रद्द कराव्यात, अशी नवी मागणी करत मनोज जरांगे यांनी आपले ११ वे उपोषण आंदोलन शनिवारी सुरू केले. जात पडताळण्या समित्या अन्य राज्यात नाहीत, अशी माहिती राधाकृष्ण विखे यांनीच दिली होती. या समित्यांची महाराष्ट्रात गरज काय, असा प्रश्नही जरांगे यांनी उपस्थित करत, जर प्रमाणपत्राबाबतच्या मागण्या अंतरवली सराटीमध्ये मान्य झाल्या नाही तर मुंबईकडे आंदोलन कूच करेल, असा इशारा राज्य सरकारला दिला.

सहा कोटी लोकसंख्या असणाऱ्या मराठा मुलांचे प्रश्न सोडविण्यासाठी हे आंदोलन केले जात आहे. ज्यांनी कुणबी प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केले आहे तसेच हैदराबाद गॅझेटिअरच्या निकषानुसार अर्ज केले असतील तसेच अर्ज करुन प्रमाणपत्र न मिळालेल्यांनी व वैधता प्रमाणपत्र न मिळालेल्यांनी यावे. वैधता कशी मिळत नाही, हे मी पाहतो, असे सांगत मनोज जरांगे यांनी पुन्हा उपोषणास सुरुवात केली. आंदोलन मुंबईत करण्याचे ठरले तर जायचे का असे विचारले आणि मुंबईकडे जाण्याचा कल वाढता आहे का, याची चाचपणी केली. वर्षा बंगल्यावर जाण्याबाबतचा प्रतिसाद वाढता रहावा, असे सूचक वक्तव्य जरांगे यांनी केले. मराठा समाजातील प्रत्येक प्रश्न आता सोडविण्यासाठी हाती घेतला आहे. सर्व स्तरातील मराठा या आंदोलनात येतील, असा प्रयत्न केला आहे. सर्व प्रश्न मार्गी लागावेत असे प्रयत्न करु, जर प्रश्न अंतरवली सराटीमध्ये सुटले नाहीत तर मुंबईत जाऊ. वर्षा बंगल्यावर जाऊ किंवा आझाद मैदानावरही जाऊ, असा इशारा जरांगे यांनी दिला. 'मुंबई'करांनी आम्हाला सहन करावे, आम्हीही तुमचेच आहोत, असे आवाहन जरांगे यांनी केले. मुंबईत कधी येणार याची माहिती देऊ. मग काही बाबी सहन करा, असे आवाहन जरांगे यांनी केले.



### मराठा मोठा व्हावा म्हणून आंदोलन!

आपला गावातील एखादा नेता आंदोलनाकडे आला नाही तर त्याचे नाव सांगा, स्थानिक स्वराज संस्थांतील सर्व आजी माजी नेते आले नाही तर पुढच्या निवडणुकीमध्ये त्याचा वचपा काढू, असा इशाराही जरांगे यांनी दिला. मराठा मोठा व्हावा म्हणून हे आंदोलन आखले असल्याचे जरांगे म्हणाले. आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी मुंबईकडे जाण्याचा इशारा देत जरांगे यांनी संजय शिरसाठ आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर तिरकसपणे टीका केली.

### एका वर्गाला तीन वेगळे आरक्षण मिळू शकतात का -ॲड. गुणरत्न सदावर्ते

मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर दबाव वाढवला असतानाच त्यांच्या भूमिकेवरून ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी जोरदार टीका केली आहे. तसेच एका वर्गाला तीन वेगवेगळे आरक्षण मिळू शकते का? असा सवाल त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना ॲड. गुणरत्न सदावर्ते म्हणाले, 'लोकशाहीमध्ये मत मांडण्याचा अधिकार आहे. परंतु, धमकी देऊन मुंबईला येऊन डिस्टर्ब करतो असे वक्तव्य करून, जालना आणि संभाजीनगरमध्ये रस्ता रोको करून जनजीवन विस्कळीत करणे, अशांना सामाजिक जीवनात मान्यता नाही. जरांगेच्या मागण्या संविधानाला धरून नाहीत, ते उघडे पडले आहेत अन् सावरासावर करत आहेत. ते हौस-मौज आणि व्यक्तिगत हे करत आहेत. त्यांच्यामुळे मराठा भावांचा फायदा होत नाही, युवकांना चुकीच्या मार्गाने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे, असे त्यांनी म्हटले.

# युवासेना उपजिल्हाप्रमुख आस्तिक चव्हाण याच्यासह तिघांना अटक!

## ५ कोटींच्या प्लॉट फसवणूक प्रकरणात पोलिसांची कारवाई






प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या युवासेनेचे अकोला पूर्व उपजिल्हाप्रमुख आस्तिक चव्हाण याच्यासह तिघांना स्थानिक गुन्हे शाखेने कोट्यवधींच्या भूखंड फसवणूक प्रकरणात अटक केली आहे. सुमारे ५ कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या जमिनीची बनावट कागदपत्रांच्या आधारे विक्री करून फसवणूक केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर असून, राजकीय वर्तुळात या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे. या भूखंड घोटाळ्यात खरेदीखत तयार करुन देणाऱ्या शासकीय यंत्रणेतील कोणाचा सहभाग आहे याचा ही शोध घेण्याची गरज आहे. त्याच बरोबर मुंबई स्थित त्या महिला पोलिस अधिकाऱ्याने या सर्व प्रकरणात काही हस्तक्षेप केला काय याची चौकशी अकोला पोलिस घेईल काय अशी विचारणा होत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या युवासेनेचे अकोला पूर्व उपजिल्हाप्रमुख पद आता तरी काढणार काय अशी विचारणा आता होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार शांता प्रकाश बाहेकर (वय ४८, रा. गाडेकुळ कॉलनी, अकोला) यांच्या मालकीच्या मलकापूर येथील सर्व्हे नं. ८ मधील ५०७५ चौ. फूट (प्लॉट नं. २९) या जमिनीबाबत हा संपूर्ण प्रकार घडला. संशयित आरोपींनी आपापसात संगनमत करून एका महिलेला मूळ मालक असल्याचे भासवून तिचे खोटे नाव धारण करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर उल्हासनगर व अकोला येथे या जमिनीचे बनावट कुलमुखत्यारपत्र आणि खरेदीखताचे दस्तावेज तयार करून सुमारे ५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात उघडकीस आले. याप्रकरणी अकोला येथील सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा (अपराध क्र. ३०३/२०२६) दाखल करण्यात आला होता.

### ६ दिवसांची पोलीस कोठडी

अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ६ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. बनावट दस्तावेज तयार करण्यात आणखी कोण-कोण सहभागी होते, तसेच या रॅकेटमध्ये इतर कोणाची मदत झाली आहे का, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. या कारवाईमुळे अकोल्यातील भू-माफिया आणि राजकीय आश्रयाने बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्यांमध्ये तीव्र घबराट पसरली आहे.

### दोन तासांत तीन आरोपी गजाआड

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अचित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक नितीन लेव्हर्कर यांना तातडीने तपासाचे आदेश दिले. गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी अवघ्या २ तासांत शोध घेऊन पुढील तीन आरोपींना ताब्यात घेतले. यात आस्तिक श्रीकृष्ण चव्हाण (वय ३०, रा. संतोष नगर, मलकापूर, अकोला - युवासेना उपजिल्हाप्रमुख, अकोला पूर्व), राहुल अशोकराव जाधव (वय ४३, रा. नायगाव, जुने शहर, अकोला), प्रियंका लक्ष्मण पाटील उर्फ प्रियंका नामाजी चव्हाण (वय ३०, रा. सरस्वती नगर, अकोला) याचा समावेश आहे.

# चान्नी पोलिसांच्या हद्दीत वरली-मटक्याचा सुळसुळाट ?

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला :** चान्नी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुमारे २० गावांमध्ये वरली-मटका व सट्टा व्यवसाय सुरू असल्याचा गंभीर आरोप नागरीकांतर्फेâ करण्यात येत आहे. या अवैध व्यवसायाकडे स्थानिक पोलिसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चा परिसरात सुरू असून, पोलिस ठाण्याच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिकांकडून करण्यात येत असलेल्या आरोपांनुसार, मोठ्या गावातून दरमहा सुमारे २० हजार रुपये, तर छोट्या गावातून १५ ते १७ हजार रुपयांपर्यंतचा कथित 'हप्ता' पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचत असल्याची चर्चा आहे. एवढेच नव्हे, तर काही वेळा पोलिसांसाठी मटण पार्टीचे आयोजन करण्याचीही मागणी केली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र आणि अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. एकीकडे अकोला पोलिसांकडून अवैध जुगार, मटका आणि इतर गैरकायदेशीर व्यवसायांविरोधात 'ऑपरेशन प्रहार'च्या माध्यमातून कारवाया सुरू आहेत. अलीकडेच स्थानिक गुन्हे शाखेने वरली मटका व जुगार अड्डयांवर कारवाई करून आरोपींना ताब्यात घेतल्याचे वृत्तही समोर आले आहे. मात्र, चांन्नी पोलिस ठाण्याच्या हद्दीतच अशा प्रकारचे अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आरोप होत असतील, तर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी याची स्वतंत्र चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### 'ऑपरेशन प्रहार'चा प्रहार नेमका कुठे?

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर वरिष्ठ पातळीवरून कारवाईचा बडगा उगारला जात असताना स्थानिक पातळीवरच दुर्लक्ष होत असल्याचे आरोप खरे ठरल्यास हा वरिष्ठ पोलिस प्रशासनासाठी गंभीर विषय ठरू शकतो. त्यामुळे चांन्नी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संबंधित गावांमध्ये स्वतंत्र पथक पाठवून वरली-मटका सुरू आहे का, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, या प्रकरणातील हप्ता व मटण पार्टीच्या आरोपांबाबत चांन्नी पोलिस ठाणे तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका कळू शकली नाही. त्यांची भूमिका आम्ही प्रकाशित करु शकतो.

# चरणगाव ग्रामपंचायतीत 14 लाखांचा अपहार !

## हायकोर्टाच्या आदेशानंतर फौजदारी कारवाईचा मार्ग मोकळा

प्रवीण वानखडे २९ ऑगस्ट

**अकोला :** पातूर तालुक्यातील चरणगाव ग्रामपंचायतीतील १४ लाख ६५ हजार ५०० रुपयांच्या कथित आर्थिक अपहाराचे प्रकरण आता थेट फौजदारी कारवाईच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल उच्च न्यायालयाने घेतल्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र दिल्याने ग्रामपंचायत प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात प्रशासकीय अधिकारी दोषी असून त्यांच्यावर कारवाईची मागणी होत आहे.

दरम्यान, पंचायत राज समिती समोर हा मुद्दा उपस्थित झाल्यास काय उत्तर जिल्हा परिषद प्रशासन देणार आहे याची जुळवाजूळव सुरु असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणात तत्कालीन सरपंच व विशेष प्रशासक मेघा देशमुख तसेच ग्रामविकास अधिकारी/सचिव जयेश तायडे यांच्याविरुद्ध तक्रार करण्यात आली आहे.



ग्रामपंचायतीच्या निधीच्या व्यवहारात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप असून, तब्बल १४,६५,५०० रुपयांच्या निधीच्या कथित अपहाराचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. प्रकरण न्यायालयापर्यंत पोहोचल्यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनानेही आता कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. ण्Eध् यांनी ँDध् यांना कायद्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्याने या प्रकरणाला निर्णायक वळण मिळाले आहे. ग्रामपंचायतीच्या निधीचा वापर नेमका कोणत्या कारणासाठी करण्यात आला? संबंधित रक्कम कोणत्या कामांसाठी मंजूर झाली होती? प्रत्यक्षात ती कामे झाली का? निधीच्या वितरण आणि खर्चाच्या प्रक्रियेत कोणाची भूमिका होती? तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये नियमांचे पालन करण्यात आले का? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता फौजदारी तपासातून समोर येणे अपेक्षित आहे. विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक निधीच्या गैरव्यवहाराचा आरोप असल्याने या प्रकरणात केवळ रक्कम वसुलीपुरता विषय मर्यादित न राहता संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही पुढे आली आहे.

त्यामुळे गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस तपासाची दिशा काय राहते आणि तपासात आणखी कोणाची नावे समोर येतात, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. हायकोर्टाच्या आदेशानंतर ण्Eध् स्तरावरून ँDध् यांना फौजदारी कारवाईचे निर्देश देण्यात आल्याने चरणगाव ग्रामपंचायतीतील कथित १४ लाख ६५ हजार ५०० रुपयांच्या अपहारप्रकरणी आता प्रशासन काय कारवाई करते, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

**CLASSIFIED**

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय. व १२ वी समकक्ष कोर्सेस

१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष

(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश

पात्रता : - १० वी, १२ वी पास /नापास, टक्कवारीची अट नाही डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश.

संपर्क

स्नेहदीप व्होकेशनल

ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती

8087958087




# चांगले काम करताना दोन शिव्या खायची तयारी ठेवा!

नाशिक : एकाच वेळी सर्व कामे सुरू केल्याने नाशिककरांना आणि त्र्यंबकमधील लोकांना त्रास होत आहे. लोकांच्या शिव्या देखील आम्हाला खाव्या लागतात. गिरीश भाऊंना आणि दादा भुसे यांना जास्त खाव्या लागतात, कारण ते इथे राहतात. आमदारांना आणि मंत्र्यांना शिव्या खाव्या लागतात. पण काळजी करू नका, कुठलेही परिवर्तन आपण करतो तेव्हा शिव्या खाव्याच लागतात. परंतु, ज्या दिवशी ही कामे पूर्ण होतील, त्या दिवशी हीच सर्व मंडळी आपल्याला फुलांचे हार देखील घालतील. फक्त आपण जे काम करत आहोत ते जनहिताचे अन् पारदर्शी असले पाहिजे, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये आयोजित तीन दिवसीय 'सिंहस्थ महा कुंभ भक्ती संगम' कार्यक्रमात शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. याच व्यासपीठावरून मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा जोरदार समाचार घेत पलटवार केला. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कुंभमेळ्याच्या कामात भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करत कामाच्या खर्चाबाबतचा रिपोर्ट जाहीर करा अशी मागणी केली होती. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, 'सगळे प्रोजेक्ट्स हे जाहीर आहेत.



## पावसाचा खोळंबा

आकाशात काळेकुट्ट ढग जमा होतात, विजांचा कडकडाट होतो आणि धुवांधार पावसाची शक्यता निर्माण होते. पण एन ऐनवेळी हे ढग वाहून जातात किंवा पाऊस न पडताच निघून जातात. यालाच आपण 'पावसाचा खोळंबा' म्हणतो. पावसाने मारलेली ही दडी कधीकधी भयंकर चिंतेचे ढग घेऊन येते.

शेतकऱ्यांसाठी हा खोळंबा अत्यंत त्रासदायक ठरतो. जून महिन्यात पेरणीची कामे पूर्ण झालेली असतात आणि कोवळी रोपे पाण्याच्या आशेने वाट पाहत असतात. अशा वेळी पावसाने दांडी मारली की, पिके सुकू लागतात आणि दुबार पेरणीचे संकट डोक्यावर घिरट्या घालू लागते. त्यामुळे बळीराजाचे डोळे सतत आभाळाकडे लागलेले असतात.फक्त शेतकरीच नाही, तर शहरांमधील जीवनही या खोळंब्यामुळे प्रभावित होते. विहिरी आणि धरणांमधील पाणीसाठा आटू लागतो, ज्यामुळे पाणीकपात आणि तीव्र उकाड्याला तोंड द्यावे लागते.

# मेजर ध्यानचंद भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व!

खेळ हा अनेक लोकांच्या आयुष्यातील अविभाज्य घटक असतो. प्रत्येकजण कोणता ना कोणता खेळ प्रकार पसंत करतो. काहीजण खेळाची आवड करिअरच्या दिशेनं पुढे नेतात. तर काही लोक आपल्या आवडत्या क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना फॉलो करत खेळाचा आनंद घेतात. देशाला क्रीडा क्षेत्राचा मोठा वारसा लाभलाय. यात हॉकीतील दिग्गज खेळाडू आणि जादूगार अशी ओळख असलेल्या मेजर ध्यानचंद, लाखो देशवासियांसाठी प्रेरणादायी असलेले व्यक्तीमत्व दिवंगत धावपटू मिल्खा सिंग यांच्यासह सध्याच्या घडीला लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या क्रिकेटमध्ये देवाची उपमा लाभलेल्या सचिन तेंडुलकर या खेळाडूंचा समावेश आहे. क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक वर्षी देशात २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी झाला. त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीड दिन म्हणून साजरा केला जातो़. हा दिवस हॉकीच्या जागतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला आहे. त्यांना 'हॉकीचे जादूगार' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने १९२८, १९३२ आणि १९३६ अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदके जिंकली. भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांचे अमूल्य

### आज राष्ट्रीय क्रीडा दिन

योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने २०१२ पासून त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून घोषित केला. लोकांना नियमित खेळ आणि व्यायामाचे महत्त्व पटवून देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये या दिवशी देशात डफिट इंडिया चळवऴ सुरू केली. या दिवशी देशातील उत्कृष्ट खेळाडूंना राष्ट्रीय क्रीडा पुरस्काऱ (जसे की मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार) प्रदान करून सन्मानित केले जाते

देशातील खेळांच्या परंपरेचं स्मरण करण्यासाठी २९ ऑगस्टला राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. या दिवशी मेजर ध्यानचंद आणि इतर भारतीय क्रीडा दिग्गजांचं स्मरण केलं जातं.देशातील खेळांची परंपरा जपण्यासाठी आणि भारतीय क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठितांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन देशाभरात साजरा केला जातो. विशेष म्हणजे हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना ही श्रद्धांजली आहे. आज भारतीय हॉकी दिग्गजाची ११५वी जयंती आहे.

'हॉकीचे जादूगार' असलेले मेजर ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अहमदाबादमधील राजपूत कुटुंबात झाला. त्यांचे वडील समेश्वर सिंग यांच्याप्रमाणेच ते




भारतीय सैन्यात भरती झाले आणि त्यांना तेथील खेळाची आवड निर्माण झाली. भारतीय हॉकीच्या महान खेळाडूचं मूळ नाव ध्यानसिंग होतं, परंतु ते रात्रीच्या प्रकाशातच सराव करत असे आणि त्यामुळं त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच नाव ध्यानचंद ठेवलं. आपल्या २२ वर्षांच्या कारकिर्दीत, त्यांनी ४०० गोल केले आणि तीन ऑलिम्पिक पदकंही जिंकली. त्यांच्या स्मरणार्थ दिल्लीतील राष्ट्रीय हॉकी स्टेडियमचं २००२ मध्ये मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम असं नामकरण करण्यात आलं. भारतीय हॉकीमधील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना १९५६ मध्ये पद्मभूषण पुरस्कारानंही सन्मानित करण्यात आलं, जो भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. त्यांनी आपल्या शौर्यानं फक्त खेळातच योगदान दिलं नाही तर नंतरच्या काळात प्रशिक्षक म्हणूनही काम केलं. पटियाला येथील राष्ट्रीय क्रीडा संस्थेत ते मुख्य प्रशिक्षक होते. तसंच, मेजर ध्यान खेलरत्न पुरस्काराद्वारे भारतीय हॉकी दिग्गजाच्या नावानं दरवर्षी क्रिडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्यांना सन्मानित केलं जातं. अशा या महान खेळाडूला श्रद्धांजली वाहण्यासाठी भारत सरकारनं २०१२ मध्ये त्यांचा वाढदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त इंदिरा गांधी स्टेडियमवर फिट इंडिया चळवळ सुरु केली होती. लोकांना निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरित करणं हा या चळवळीचा उद्देश आहे. चळवळ व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन जीवनात शारीरिक क्रियाकलाप आणि खेळ समाविष्ट करण्यास प्रोत्साहित करते. चळवळ लोकांना रोग टाळण्यासाठी जीवनशैलीत लहान बदल करण्यास मदत करते. विविध संस्था विशेष फिटनेस कार्यक्रम आणि क्रीडा कार्यक्रम आयोजित करुन हा दिवस साजरा करतात. राष्ट्रीय क्रीडा दिन राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

दरवर्षी राष्ट्रपती भवनात हा कार्यक्रम आयोजित केला जातो आणि भारताचे राष्ट्रपती देशातील उत्कृष्ट खेळाडूंना राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्रदान करतात. मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी आणि व्यक्तीमत्व आहे. देशातीलच नव्हे तर जगातील महान हॉकीपटूंच्या यादीत अव्वलस्थानी असलेल्या मेजर ध्यानचंद यांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांनी भारतीय लष्करात प्रवेश केला. १९२२ ते सैनिकाच्या रुपात लष्करात जॉईन झाले. त्यांना पहिल्यापासूनच खेळाची आवड होती. ते एक उत्तम खेळाडू होते. पण त्यांना हॉकीची प्रेरणा मिळाली ती सुभेदार मेजर तिवारी यांच्याकडून जे स्वत: क्रीडा प्रेमी होते. ध्यानचंद यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखालीच हॉकी खेळण्यास सुरुवात केली. हॉकीतील लक्षवेधी कामगिरीनंतर ध्यानचंद यांना १९२७ मध्ये 'लांन्स नायक' पदावर बढती देण्यात आली. १९३२ मध्ये नायक आणि १९३६ मध्ये सुभेदार असे प्रमोशन त्यांना मिळत गेले.

मैदानातील सातत्यपूर्ण कामगिरीसोबत त्यांची बढती होत राहिली. लेफ्टनंट, कॅप्टन आणि मेजर या पदापर्यंत त्यांनी मजल मारली. मेजर ध्यानचंद यांच्यातील कौशल्याबाबत बोलताना स्टिकला चेंडू जणू चिटकलेला असायचा असे वर्णनही ऐकायला मिळते. एकदा तर चक्क त्यांची हॉकी स्टिक तोडून त्यांत चुंबकिय किंवा अन्य काही गोष्टीचा वापर करण्यात आलाय का का? हे पाहण्यात आले होते. मेजर ध्यानचंद यांनी १९३६ मध्ये बर्लिन ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व केल होते. ध्यानचंद यांनी १९२६ ते १९४८ दरम्यान ४०० हून अधिक सामने खेळले. यात त्यांनी जवळपास १००० गोल डागण्याचा पराक्रम केलाय. हॉकीच्या मैदानात अभूतपूर्व कामगिरीसाठी त्यांना सन्मानित करण्यासाठी २०१२ पासून भारत सरकारने त्यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. ऑलिम्पिक स्पर्धेत हॉकी संघाने ऐतिहासिक ब्राँझ पदक पटकावल्यानंतर क्रीडा क्षेत्रात राजीव गांधी यांच्या नावाने दिला जाणारा सर्वोच्च खेलरत्न पुरस्काराला त्यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ३ डिसेंबर १९७९ रोजी ध्यानचंद यांचे निधन झाले होते.

# श्रावण पौर्णिमा: हिंसाचाराकडून करुणेकडे नेणारे प्रज्ञा आणि शीलाचे बंधन

मानवी इतिहासात असे अनेक क्षण आले ज्यांनी समाजाची विचारसरणी आणि संस्कृती बदलून टाकली. श्रावण पौर्णिमेचा दिवस हा बौद्ध परंपरेत असाच एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनकारी मानला जातो. हा दिवस केवळ एका धार्मिक सणाचा नसून, तो क्रूरतेवर करुणेच्या, द्वेषावर प्रेमाच्या आणि अहंकारावर प्रज्ञेच्या विजयाचे प्रतीक आहे. याच पावन दिवशी अंगुलीमालाच्या जीवनाला एक नवी दिशा मिळाली आणि एका भयंकर हिंसक व्यक्तीचे रूपांतर कारुण्यमयी भिक्खूमध्ये झाले.

अंगुलीमाल, ज्याच्या नावाचा थरकाप संपूर्ण प्रदेशात पसरला होता, जो क्रूरतेची पराकाष्ठा बनला होता, त्याचा अहंकार आणि क्रोध श्रावण पौर्णिमेला शांत झाला. भगवान बुद्धांच्या असीम करुणेने आणि तत्त्वज्ञानाने त्याच्यातील पशूचा अंत केला. बुद्धांनी त्याला दिलेला संदेश —



"द्वेषाचा अंत द्वेषाने नव्हे, तर केवळ प्रेमानेच होतो" — हा केवळ अंगुलीमालासाठी नव्हता, तर तो संपूर्ण मानवजातीला मिळालेला एक महान धडा होता. या प्रसंगानंतर अंगुलीमालाने आपली शस्त्रे कायमची फेकून दिली आणि समाजाच्या रक्षणासाठी प्रज्ञा, शील आणि करुणेची वाट धरली.

बुद्धांच्या शरणात आल्यानंतर अंगुलीमालाने बांधलेल्या तीन गाठी या केवळ विधी नव्हत्या, तर ते जीवनमूल्यांचे अंगीकार होते: प्रज्ञा: अज्ञानाचा अंधार दूर करून सत्याची ओळख करून घेणे. शील: नैतिक आचरण आणि हिंसाचाराचा पूर्ण त्याग करणे. करुणा: प्रत्येक प्राणिमात्राविषयी मनात आदर आणि प्रेमाची भावना ठेवणे. आजच्या काळात, जेव्हा जगात द्वेष, हिंसा आणि असहिष्णुता वाढताना दिसत आहे, तेव्हा श्रावण पौर्णिमेचे हे महत्त्व अधिकच प्रासंगिक ठरते. अंगुलीमालाचे हे परिवर्तन आपल्याला शिकवते की, कुठलीही व्यक्ती सुधारणांच्या पलीकडे नसते. योग्य मार्गदर्शन आणि करुणेचा स्पर्श मिळाला तर महाक्रूर व्यक्तीही अहिंसेचा मार्ग स्वीकारू शकते. श्रावण पौर्णिमा आपल्याला हाच विचार देते की, शस्त्रांच्या ताकदीपेक्षा शांती आणि प्रेमाची ताकद नेहमीच मोठी असते. या पवित्र दिवशी बुद्धांच्या 'प्रज्ञा, शील आणि करुणा' या त्रिसूत्रीचा अंगीकार करून समाजात बंधुभाव आणि शांतता प्रस्थापित करणे हीच खरी अंगुलीमालाच्या परिवर्तनाची आणि बुद्धांच्या शिकवणीची सार्थकतेची दिशा ठरेल.


**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
मो. 9822674487


# संपूर्ण आयुष्य जनता जनार्दनाच्या उत्थानासाठी खर्ची घालणारे अमर शेख!

## स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा जागर

अमर शेख यांचे मूळ नाव मेहबूब हुसेन पटेल ते महाराष्ट्रातील एक नामवंत शाहीर होते. त्यांच्या आईचे नाव मुनेरबी होते. बार्शी येथील गरीब मुसलमान कुटुंबात त्यांचा जन्म २० ऑक्टोबर १९१६रोजी झाला.या मुलाला विलक्षण पल्लेदार, पहाडी आवाजाची निसर्गदत्त देणगी तसेच मराठी लोकगीतांचा समृद्ध वारसा आईकडून लाभला होता. कॉम्रेड अमर शेख यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात बार्शी येथून झाली. ते प्रथमतः बार्शीमध्ये असलेली राजण मिल गिरणीमध्ये कामगार होते. तेथे सुरू असलेल्या आयटक या केंद्रिय कामगार संघटनेची शाखा त्या मिलमध्ये होती. त्या गिरणीसमोर होत असणारे लढे, गेट सभा, आंदोलने यामुळे प्रभावित होत, त्यांना डाव्या विचारांची आवड निर्माण झाली. कॉम्रेड रघुनाथ कऱ्हाडकर या कम्युनिस्ट नेत्याच्या मार्गदर्शनाखाली ते तेथील कामगारांना संघटित करू लागले पुढे ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचेही सभासद झाले. त्यांनी बार्शीमध्ये शेतसारा वाढीविरुद्ध त्यांनी अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली २५ हजारांचा मोर्चा काढला होता.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, गोवा मुक्तिसंग्राम यांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. शाहीर अमर शेख यांनी लोककलेच्या माध्यमातून समाजाला जागे करण्याचे व्रत स्वीकारले होते. त्यांच्या लोककलेला क्रांतीची धग होती, म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो, गोवा मुक्ती आंदोलन असो किंवा मुंबईतील गिरणी कामगारांच्या समस्या असोत, त्यांच्या लेखणीने आणि आवाजाने समाजाला जागे केले होते. पोवाडे, गीते, लोकगीते, लोकनाट्ये लिहून विचारांचा प्रसार त्यांनी केला होता. ते नुसतेच मनस्वी कवी नव्हते, तर जनमानसात आदराचे स्थान मिळालेले लोकशाहीर होते. इप्टा या डाव्या विचारांनी चालत असलेल्या सांस्कृतीक मंचाची प्रेरणा घेत कॉम्रेड अमर शेखांनी लाल बावटा कला पथकाची स्थापना केली होती. यामध्ये कॉम्रेड अण्णा भाऊ साठे, शाहीर द. ना. गव्हाणकर यांची जबरदस्त साथ लाभली. अमर शेखा यांची कविता लोकांच्या हृदयात रुजली होती. सामान्यांच्या उत्कर्षासाठी त्यांनी आपली प्रतिभा वेचली. मार्क्सवादावर अढळ निष्ठा ठेवत संपूर्ण हयात भारतीय कम्युनिस्ट पक्षात त्यांनी काम केले.

गरिबीमुळे कधी बसचालकाबरोबर क्लीनर म्हणून, तर कधी गिरणी कामगार म्हणून त्यांना काम करावे लागले. गिरणी संपात पुढाकार घेतल्यामुळे त्यांना विसापूरच्या तुरूंगातही जावे लागले. तेथे भेटलेल्या कॉम्रेड रघुनाथ कऱ्हाडकर यांच्या प्रभावामुळे ते कम्युनिस्ट झाले. पोलिसांचा ससेमिरा चुकवत ते कोल्हापूरला आले व मास्टर विनायकांच्या स्टुडिओत काम करू लागले. येथेच त्यांचे मित्रांनी ‘ अमर शेख’ असे नामकरण केले. राष्ट्रीय चळवळीत ते १९३०-३२ च्या सुमारास सामील झाले. पुढे ज्योती म्हणजे पूर्वाश्रमीच्या कुसुम शामराव जयकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला (१९४७). स्वतः एक श्रमिक म्हणून सर्वसामान्यांच्या उत्थानाचे स्वप्न त्यांनी पाहिले. आपल्या रचना रसाळपणे बुलंद आवाजात गात त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा यशस्वी प्रचार केला. स्वरचित आणि इतरांचीही कवने ते प्रभावीपणे पेश करीत. गोवामुक्ति-आंदोलनातही त्यांनी मोठे योगदान दिले. चिनी व पाकिस्तानी आक्रमणांच्या वेळी



आपल्या शाहिरीने त्यांनी लाखो रुपयांचा निधी देशासाठी गोळा केला. स्वतः एक श्रमिक म्हणून सर्वसामान्यांच्या उत्थानाचे स्वप्न त्यांनी पाहिले. उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी वाणी, लेखणीचा यज्ञ त्यांनी मांडला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाट्ये इत्यादींचा समावेश होता.

जनसमुदायाला भारून टाकण्याचे प्रभावी अंगभूत कौशल्य त्यांच्याजवळ होते. त्यांची लेखणी जिवंत, ज्वलंत आणि हृदये प्रदीप्त करणारी होती. प्रसार आणि प्रचारकार्यात या गुणांचा त्यांनी पुरेपूर उपयोग केला. त्यांच्या या गुणांचा वारसा त्यांच्या कन्या प्रेरणा आणि मलिका यांच्यातही दिसून येतो. कवितेची अंतर्लय व रचना यमकप्रचुर करण्याची अमर शेख यांची प्रवृत्ती होती. रौद्र रसाचा आविष्कारही त्यांच्या काही कवनांतून त्यांनी घडविला. त्यांच्या बऱ्याचशा रचना प्रासंगिक असल्या, तरी त्यांत विचारभावनांचे थरारते चैतन्य जाणवते. ते नुसतेच मनस्वी कवी नव्हते, तर जनस्वी लोकशाहीर होते. त्यांची कविता जनतेच्या ओठांवर रूजली, फुलली आणि ती लोकगंगेने जगविली. प्र. के. अत्रे, मं. वि. राजाध्यक्ष यांनी मुक्तकंठाने या शाहिराचा गौरव केला आहे. अत्रे त्यांना ‘महाराष्ट्राचा मायकोव्हस्की’ म्हणत. त्यांना सर्वांत प्रिय असलेली पदवी होती लोकशाहीर; कारण आपले सारे आयुष्यच त्यांनी जनताजनार्दनाला अर्पण केले होते. कविता हा या लोकशाहिराचा बहिश्चर प्राण होता आणि सामान्यांतल्या सामान्याचे उत्थान हा त्यांच्या आत्म्याचा आवाज होता.

कलश (१९५८) आणि धरतीमाता (१९६३) हे त्यांचे काव्यसंग्रह, अमरगीत (१९५१) हा गीतसंग्रह आणि पहिला बळी (१९५१) हे त्यांनी लिहिलेले नाटक. त्यांनी रचलेल्या पोवाड्यांत छ. शिवाजी महाराज, होळकर आणि उधमसिंग यांच्या पोवाड्यांचा समावेश आहे. युगदीप व वख्त की आवाज ह्या मासिकांचे त्यांनी संपादन केले. प्रपंच आणि महात्मा ज्योतिबा फुले ह्या चित्रपटांतून आणि झगडा या नाटकातून त्यांनी प्रभावी आणि ढंगदार भूमिका केल्या. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात साम्यवादी पक्षाशी झालेल्या मतभेदांच्या भोवऱ्यात सापडल्याने त्यांनी तो पक्ष सोडला. अखेर त्यांनी मृत्यू २९ ऑगस्ट १९६९ रोजी या जगाचा निरोप घेतला. मात्र आजही त्यांच्या साहित्यरूपाने पुढील पिढ्यांना प्रेरणा देत आहेत.

लोककलांचे जतन, संवर्धन व संशोधन व्हावे तसेच शाहिरी व लोक-कलेचा वारसा वृद्धिंगत व्हावा या उद्देशांनी मुंबई विदयापीठात त्यांच्या सन्मानार्थ ‘शाहीर अमर शेख ’ अध्यासन सुरू करण्यात आले आहे. मराठी कवी आणि लेखिका मल्लिका अमर शेख ह्या अमर शेख यांच्या कन्या होत.

# वर्षावास: बौद्ध परंपरेतील साधना, चिंतन आणि संयमाचा काळ



वर्षावास ही बौद्ध परंपरेतील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण प्रथा आहे. 'वर्षा' म्हणजे पावसाळा आणि 'वास' म्हणजे राहणे. म्हणजेच पावसाळ्याच्या तीन महिन्यांच्या काळात एकाच ठिकाणी राहून साधना आणि ध्यानधारणा करणे याला 'वर्षावास' असे म्हणतात. आषाढ पौर्णिमेपासून ते आश्विन पौर्णिमेपर्यंत (साधारणपणे जुलै ते ऑक्टोबर) हा काळ पाळला जातो.

वर्षावासाचा ऐतिहासिक संदर्भ आणि पार्श्वभूमी

भगवान बुद्धांच्या काळात भिक्षू वर्षभर ठिकठिकाणी फिरून धम्मप्रचार करत असत. मात्र पावसाळ्यात पावसामुळे रस्ते चिखलमय होत, नद्या-नाले भरून वाहत असत. तसेच, पावसाळ्यात जमिनीवर आणि गवतात लहान-लहान कीटक, जीवजंतू आणि नवीन वनस्पती उगवतात. फिरताना भिक्षूंच्या पायाखाली दडून या सूक्ष्म जीवांची हिंसा होऊ नये आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये, या करुणामयी विचारातून भगवान बुद्धांनी भिक्षूंसाठी पावसाळ्यात तीन महिने एकाच ठिकाणी राहून वर्षावास करण्याची नियमबद्ध परंपरा सुरू केली.

वर्षावासाचे धार्मिक आणि अध्यात्मिक महत्त्व

आत्मपरीक्षण आणि साधना: वर्षभर फिरल्यानंतर हे तीन महिने भिक्षूंना एकाग्रतेने ध्यान, विपश्यना आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करण्यासाठी मिळतात.

अहिंसेचे पालन: निसर्गातील लहानात लहान जिवालाही इजा पोहोचू नये हा बौद्ध तत्त्वातील 'अहिंसा' आणि 'करुणा' या मूल्यांचा प्रत्यक्ष आचार म्हणजे वर्षावास होय.

उपासक आणि भिक्षू यांच्यातील नाते: वर्षावासाच्या काळात भिक्षू एकाच विहारात राहत असल्याने स्थानिक उपासक-उपासिकांना (श्रावक) दररोज धम्मदेसना ऐकण्याची, भिक्षूंची सेवा करण्याची आणि दानधर्म करण्याची संधी मिळते.

यामुळे बौद्ध समाजातील परस्पर संवाद आणि एकता वाढते.

कठिन चीवर दान (पवारणा)

वर्षावासाची समाप्ती आश्विन पौर्णिमेला 'पवारणा' उत्सवाने होते. वर्षावास यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर भिक्षूंना 'चीवर' (वस्त्र) दान केले जाते, ज्याला 'कठिन चीवर दान' म्हणतात. हा काळ बौद्ध उपासकांसाठी अत्यंत पुण्यदायी मानला जातो.

थोडक्यात सांगायचे तर, वर्षावास हा केवळ एका ठिकाणी राहण्याचा काळ नसून तो मन शांत करण्याचा, निसर्गाचा आदर करण्याचा, संयम पाळण्याचा आणि धम्माच्या मार्गावर अधिक दृढ होण्याचा सण आहे.

# वृक्षारोपण हितकारक, मात्र दुर्लक्षित

वृक्षारोपण ही केवळ एक सामाजिक किंवा पर्यावरणाची चळवळ नसून मानवी अस्तित्वासाठी अत्यंत आवश्यक असलेली गरज आहे. वाढते नागरीकरण, प्रदूषण आणि जंगलांची होणारी तोड यांमुळे निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे. या समस्येवर मात करण्याचा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय म्हणजे 'वृक्षारोपण'. परंतु गेल्या काही वर्षांत वृक्ष लागवड करण्याऐवजी वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडतो आहे.

पर्यावरणाचा समतोल आणि शुद्ध हवा: झाडे वातावरणातील विषारी कार्बन डायऑक्साइड (CO2) वायू शोषून घेतात आणि मानवाला जगण्यासाठी आवश्यक असलेला प्राणवायू (ऑक्सिजन - O2) देतात. झामांमुळे हवेतील धुलिकण व प्रदूषण कमी होऊन हवा शुद्ध राहते.

हवामान बदल आणि तापमानावर नियंत्रण: सध्या जगभरात 'ग्लोबल वॉर्मिंग'ची (जागतिक तापमानवाढ) मोठी समस्या निर्माण झाली आहे. झाडे सूर्यकिरणे शोषून घेतात आणि जमिनीचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. मुबलक वृक्षराजी असलेल्या भागात उष्णतेची लाट कमी जाणवते.

जमिनीची धूप थांबवणे: पावसाच्या पाण्यामुळे जमिनीचा सुपीक थर वाहून जातो. झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवतात, ज्यामुळे जमिनीची धूप थांबते आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते.

जलपुनर्भरण (WATER RECHARGE): वृक्षांची मुळे पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यास मदत करतात. यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते आणि विहिरी, बोअरवेल यांना दीर्घकाळ पाणी राहते.

जैवविविधतेचे रक्षण: झाडे आणि जंगले ही हजारो पक्षी, कीटक आणि वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास (घर) असतात. वृक्षारोपण केल्याने निसर्गातील अन्नसाखळी आणि जैवविविधता सुरक्षित राहते.

आर्थिक व सामाजिक उपयोग: वृक्षांपासून मानवाला फळे, फुले, औषधी वनस्पती, लाकूड, आणि सावली मिळते. शेती आणि आयुर्वेदात वनस्पतींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे

"वृक्ष वल्ली आम्हा सोयरी या संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे निसर्ग आणि झाडे हेच आपले खरे सोबती आहेत. आपण लावलेले एक झाड येणाऱ्या अनेक पिढ्यांना स्वच्छ हवा, पाणी आणि आरोग्यदायी जीवन देऊ शकते. म्हणूनच 'एक माणूस, एक झाड' हा संकल्प करून प्रत्येक नागरिकाने केवळ वृक्षारोपणच करू नये, तर त्या रोपाचे संगोपन व रक्षण करण्याची जबाबदारीही घेतली पाहिजे.

केवळ वृक्षारोपण करून भागणार नाही तर संगोपन देखील करावे लागेल. तसेच वृक्ष संवर्धन विषयी असलेल्या कायद्याची बुज देखील राखावी लागणार आहे. त्याशिवाय तरणोपाय नाही. कारण सध्या पर्यावरणाचा समतोल बिघडतो आहे. ग्लोबल वॉर्मिंग जगापुढे समस्या आहे. जागतिक परिषदांमध्ये याबाबत चर्चा होते. वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी हरीत ऊर्जा स्रोत वाढवले जात आहे. कारण सध्या हवामानात होत असलेला बदल मानवी जीवनासाठी धोकादायक ठरतो आहे.



# 'हर बोला महादेव'च्या जयघोषाने उद्या निनादणार सातपुडा खोरे ....

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला:** सातपुडा पर्वताच्या कुशीत वसलेल्या धारगडमध्ये श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी देवाधिदेव महादेवाचा यात्रा उत्सव साजरा केला जातो. यावर्षी, ही यात्रा रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता सुरू होईल. शिवभक्तांना वन्यजीव विभागाच्या नियमांचे पालन करून धारगडला भेट देता येईल आणि जलाभिषेक करता येईल. धारगडला जाणाऱ्या भाविकांना खटकाली आणि पोपटखेड तपासणी नाक्यांवरून प्रवेश दिला जाईल. यात्रेदरम्यान संपूर्ण परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून जाईल. यात्रेदरम्यान अकोला आणि अमरावती जिल्ह्यांचे पोलीस बंदोबस्तात असतील. अकोट डेपोमधून एसटी बस धावतील. अकोट शहरात भाविकांना चहा, पाणी आणि फळे दिली जातील. शिवभक्तांसाठी सर्व सुविधांची व्यवस्था धारगड सेवा समिती करणार आहे. धारगडमध्ये विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. परतीच्या मार्गावर श्री हनुमानगड सेवा समिती नरनाळातर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. अनेक भक्त रेल्वेने सुद्धा अकोट पर्यंत जातील आणि तेथून धारगड प्रयाण करतील.



### धारगडला कसा करणार प्रवेश

» खटकाली नाका इथून दुचाकी व चारचाकी वाहनांना 30 ऑगस्ट च्या सकाळी आठ ते 31 ऑगस्ट च्या दुपारी तीन पर्यंतच प्रवेश देण्यात येईल पादचारी भाविकांसाठी अमोना नाका खुला असेल मात्र 31 ऑगस्ट रोजी दुपारी बारापर्यंत प्रवेश मर्यादित असेल दुचाकी वर केवळ दोन व्यक्ती आणि चार चाकी वाहनात आसन क्षमतेनुसार प्रवेश मिळेल

### नियमाचे उल्लंघन केल्यास दहा हजाराचा दंड

» धारगड वन क्षेत्रात नारळ प्रसाद हार फुले विकण्यास मनाई आहे उल्लंग केल्यास दहा हजार रुपये दंड व वन्यजीव कायद्यानुसार कारवाई होईल प्रसाद कागदी किंवा कापडी पिशवीतच आणावा प्रसाद ग्रहण फक्त मंदिर परिसरातच करावे दारू तंबाखू शस्त्रे ढोल ताशे डीजे व लाउड स्पीकरवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे यात्रा संपल्यानंतर 31 ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्व भाविकांना मेळघाट क्षेत्रातून बाहेर पडणे बंधनकारक राहील

## मोकाट जनावरांवर कारवाई, मग भटक्या कुत्र्यांवर कारवाई कधी?



प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला:** शहरात मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. महानगरपालिका प्रशासनाकडून मोकाट जनावरांवर कारवाई केली जाते, मात्र ही कारवाई केवळ काही ठराविक जनावरांपुरतीच मर्यादित आहे का, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रवही वाढला आहे. नागरिकांवर हल्ले होत आहेत, डॉग बाईटच्या घटना समोर येत आहेत, तर रस्त्यावर अचानक येणाऱ्या जनावरांमुळे अपघाताचा धोकाही वाढला आहे. अकोला शहरातील रस्त्यांवर मोकाट जनावरांचा प्रश्न काही नवीन नाही. शहरातील विविध भागांमध्ये मोकाट जनावरांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

महानगरपालिका प्रशासनाकडून वेळोवेळी मोकाट जनावरांविरोधात कारवाई केली जाते. मात्र कारवाई करूनही पुन्हा त्याच ठिकाणी मोकाट जनावरे दिसून येत असल्याने या कारवाईच्या प्रभावीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रस्त्यावर मोकाट जनावरे आल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होतो. अचानक समोर आलेल्या जनावरांमुळे दुचाकीस्वारांना वाहनाचा वेग कमी करावा लागतो किंवा अचानक दिशा बदलावी लागते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. शहरातील अनेक परिसरांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या त्रासामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तारफैल परिसरात कव्हरेजसाठी जात असलेल्या एका पत्रकारावर भटक्या कुत्र्याने हल्ला करून त्यांना चावा घेतल्याची घटना समोर आली आहे. डॉग बाईटच्या घटना वेळोवेळी समोर येत असून, नागरिकांना उपचारासाठी रुग्णालयात जावे लागत आहे.

## संशयास्पद मृत्यूचे प्रकरण मनुष्यवधात बदलले...

### अल्पवयीनाचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न

प्रतिनिधी २९ ऑगस्ट



अकोला. रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत 10 ऑगस्टच्या रात्री जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. मृत व्यक्तीची ओळख मोमो शोएब अशी सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर रामदास पेठ पोलिसांनी सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान पोलिसांनी मृतकाच्या नातेवाईकांसह आजूबाजूच्या नागरिकांचे जबाब नोंदवले.

या चौकशीत मृतकाच्या छातीवर मारहाण झाल्यामुळे दुखापत झाल्याची बाब समोर आली. त्यानंतर पोलिसांनी पोस्टमार्टम अहवालाची प्रतीक्षा केली. पोस्टमार्टम अहवालामध्ये प्लीहा फुटल्यामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

## कवठा सोपीनाथ येथे नोझलसह स्प्रिंकलर चोरी

**मुर्तिजापूर** : कवठा सोपीनाथ शिवारात प्रशांत शशिकांत बाजड यांच्या शे. स. नं. १५१ मधील शेतातून गुरुवार १९ आगस्ट रोजी नोझलसह स्प्रिंकलर चोरीस गेले असून यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. प्रशांत बाजड यांनी माना पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार शेतात ठेवलेले नोझलसह असलेले स्प्रिंकलर एकुण 12 कि. 3000 रु. अज्ञात इसमाने चोरुन नेले. यामुळे बागायतदार शेतकऱ्यांमधे घबराटीचे वातावरण असून याअगोदर मुर्तीजापुर व ग्रामीण भागात विशेषतः लाखपूरी खरबनवले अनभोरा शिवारात अशा घटना घडल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

## गोरेगाव खुर्दमध्ये शेतकऱ्यांच्या लाखोंच्या व्यवहाराला ग्रहण

### संबंधित व्यापारी संपर्काबाहेर गेल्याने संभ्रम

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला** : गोरेगाव खुर्द परिसरातील शेतकऱ्यांकडून शेतमालाचा व्यवहार करून त्याची लाखो रुपयांची रक्कम थकीत ठेवल्याचा गंभीर आरोप एका व्यापाऱ्यावर करण्यात आला आहे. व्यवहारानंतर संबंधित व्यापारी संपर्काबाहेर गेल्याने शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यापाऱ्याने गावातील काही व्यक्तींना सोबत घेत परिसरातील शेतकऱ्यांशी व्यवहार केला. विश्वास संपादन करून मोठ्या प्रमाणात शेतमाल घेण्यात आला; मात्र त्यानंतर शेतकऱ्यांना देय असलेली रक्कम अदा करण्यात आली नसल्याचा आरोप आहे. शेतमाल विकल्यानंतर वेळेवर पैसे मिळतील, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यावर विश्वास ठेवला. मात्र आता पैसे मागण्यासाठी संपर्क साधला असता व्यापारी उपलब्ध होत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे मेहनतीने पिकवलेल्या मालाचे पैसे मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरशः वणवण करण्याची वेळ आली आहे. या संपूर्ण व्यवहारात गावातील काही व्यक्तींनी मध्यस्थी केल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे. त्यामुळे व्यापाऱ्यासोबत व्यवहार घडवून आणणाऱ्या संबंधित व्यक्तींची भूमिकाही तपासण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे. आतापर्यंत झालेल्या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित व्यापाऱ्याविरोधात पोलीस तक्रार, आर्थिक व्यवहारासंदर्भातील उपलब्ध कागदपत्रे सादर करून कायदेशीर कारवाई आणि थकीत रक्कम वसुलीसाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

या बाबत कारवाई करीता पोलीस अधिक्षकांची भेट घेऊ असा इशारा भाजपा ओबीसी मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांनी दिला आहे.



## जिल्हा स्त्री रुग्णालयात सर्व यंत्रणा सुस्थितीत

### सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे स्पष्टीकरण

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालक अतिदक्षता कक्षाच्या व्हेंटिलेटरमध्ये स्फोट होऊन 24 ऑगस्ट रोजी पहाटे 3.30 वाजता दुर्दैवी घटना घडली. या घटनेबाबत प्रसार माध्यमे आणि समाज माध्यमावर वस्तुस्थितीशी विसंगत काही बातम्या प्रसारित झाल्या असून त्याची वस्तुस्थितीदर्शक माहिती सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती मुख्य अभियंता कार्यालयाकडून देण्यात आली आहे. एप्रिल व मे 2026 मध्येच सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाने जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय व इतर रुग्णालयातील अग्नीसूचक व अग्निशमन यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करून महापालिकेच्या अग्निशमन अधिकाऱ्याकडे फॉर्म-बी सादर करण्याकरता ई-निविदा पूर्ण झालेली होती. संबंधित फायर कंत्राटदारास 23 जून 2026 रोजीच कार्यारंभ करण्याचा आदेश जारी करण्यात आला होता. विभागाद्वारे आवश्यक कार्यवाही आधीच पूर्ण केलेली आहे त्यामुळे 37 दिवस पत्राकडे दुर्लक्ष केल्याची माहिती वस्तुस्थितीला धरून नसल्याचे सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती मुख्य अभियंता कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. आवश्यक यंत्रणा दुरुस्ती करून कंत्राटदाराने प्राथमिक फायर ऑडिट अहवाल 30 जून 2026 रोजी सादर केला. संपूर्ण यंत्रणा सुस्थितीत असल्याची शहानिशा करून 22 ऑगस्ट रोजी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती असे सांगून फायर ऑडिट झाले नसल्याची बाब वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याचे सांगण्यात आले आहे. विद्युत संच मांडणीचा दर्जा योग्य असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार वीज संच मांडणी मधील सर्व सुरक्षा उपकरणे, संपूर्ण वायरिंग, स्विच गिअर हे भारतीय मानक ब्युरो मानांकित व उच्च दर्जाचीच आहेत तसेच रुग्णालयातील अतिदक्षता कक्ष व नवजात बालक कक्षात विद्युत विभागाद्वारे करण्यात आलेल्या विद्युत संच मांडणीत ओव्हर करंट व अर्थ फॉल प्रोटेक्शन करिता त्रिस्त्रीस्तरीय विद्युत सुरक्षा प्रणालीचा अवलंब करण्यात आला होता व ज्या व्हेंटिलेटर मध्ये स्पोट होऊन ही दुर्दैवी घटना घडली त्यावेळेस संबंधित व्हेंटिलेटरची 32 ए क्षमतेची आरसीबीही ट्रीप झालेली होती असे सांगण्यात आले आहे.

## महिला वाहतूक पोलिसांचे ऑन-ड्यूटी अनोखे रक्षाबंधन

### ऑटोचालकाच्या मनगटावर बांधली प्रेमाची राखी



प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला:** सण-उत्सवाच्या काळातही कर्तव्यावर तैनात असलेल्या महिला वाहतूक पोलिसांनी शहरात अनोखे रक्षाबंधन साजरे केले. हेल्मेट परिधान करणाऱ्या नागरिकांप्रती आनंद प्रगट करीत त्यांनी ऑटोचालक आणि युवकांना राखी बांधून सुरक्षिततेचा संदेश दिला. कर्तव्याची बांधिलकी जपतानाच महिला वाहतूक पोलिसांनी शहरात रक्षाबंधनाचा सण अत्यंत संवेदनशीलतेने साजरा केला. घरापासून दूर राहून नागरिकांच्या रक्षणासाठी तैनात असलेल्या या महिला पोलिसांनी रस्त्यावरून जाणाऱ्या ऑटोचालक आणि युवकांच्या मनगटावर प्रेमाची राखी बांधली. ज्या चालकांनी हेल्मेट घातले नव्हते, त्यांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे आणि स्वतःच्या सुरक्षेची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## एक कोटी खर्चून नूतनीकरण तरीही जिजाऊ सभागृह पुन्हा 'गाजर गवताच्या विळख्यात'!

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला** : एक कोटी रुपये खर्च करून नूतनीकरण करण्यात आलेल्या राजमाता जिजाऊ सभागृहाची पुन्हा दुरवस्था होण्यास सुरुवात झाली आहे. सभागृहाच्या परिसरात झाडे-झुडपे तसेच गाजर गवत मोठ्या प्रमाणात वाढू लागले असून, स्वच्छता व देखभालीचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. लाखो-कोट्यवधींचा निधी खर्च करून वास्तूचे नूतनीकरण करायचे आणि त्यानंतर तिच्या देखभालीकडे दुर्लक्ष करायचे, असा प्रकार सुरू असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक तथा गटनेते निलेश देव यांनी केला आहे.या सभागृहाच्या दुरवस्थेविरोधात वंचित बहुजन आघाडीने यापूर्वी सातत्याने आवाज उठविला होता. प्रा. अंजली आंबेडकर तथा युवा नेते सुजात आंबेडकर यांनी दोन वर्षांपूर्वी राजमाता जिजाऊ जयंतीच्या दिवशी हातात झाडू घेऊन स्वच्छतेची सुरुवात केली होती. त्यानंतर २०२४ मध्ये शिवजयंतीच्या दिवशी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते सुमारे एक कोटी रुपयांच्या निधीतून नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. पाठपुराव्यानंतर सभागृहाला नवसंजीवनी मिळाली.मात्र, नूतनीकरणाला काही काळ लोटत नाही तोच पुन्हा झाडे-झुडपे, गाजर गवत आणि अस्वच्छतेने सभागृहाच्या परिसरात डोके वर काढले आहे. त्यामुळे शासनाच्या निधीतून केलेल्या नूतनीकरणाची देखभाल कोण करणार, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



## अकोल्यात १ महिन्याचे भव्य मेगा गरबा वर्कशॉप

### 'दंडिया किंग' वनभा झाला देणार विशेष प्रशिक्षण

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला:** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अकोलेकरांसाठी आनंदाची बातमी आहे. 'रीट गरबा रास २०२६'च्या वतीने अकोल्यात एका महिन्याच्या भव्य मेगा गरबा वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवा निमित्त अकोलेकरांसाठी उत्साहवर्धक बातमी समोर आली आहे. 'रीट गरबा रास २०२६'च्या वतीने ३१ ऑगस्ट ते १ ऑक्टोबर या कालावधीत १ महिन्याच्या भव्य मेगा गरबा वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्कशॉपचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे इंटरनेट सेन्सेशन आणि गुजरातचे 'दंडिया किंग' म्हणून ख्याती असलेले वनभा झाला हे स्वतः या वर्कशॉपमध्ये ७ दिवस सहभागी होऊन विद्यार्थ्यांना गरबा-रासचे विशेष प्रशिक्षण देणार आहेत. नृत्यप्रेमींसाठी आपली कला अधिक सुधारण्याची ही एक उत्तम संधी आहे. हे वर्कशॉप गौरक्षण रोड, सहकार नगर, 'टेस्ट ऑफ साऊथ' समोर, लेन्सकार्टच्या वर, अकोला या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. गरबा आणि दांडियाच्या पारंपरिक व आधुनिक स्टेप्स शिकू इच्छिणाऱ्या नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी ९७७०४ ८४८०७ किंवा ७७२२०८९४५२ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.





## विषारी औषध प्राशन केल्याने युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**मुर्तीजापूर** : तालुक्यातील सिरसो शेतशिवारातील वानखडे यांच्या शेतातील वाडी परिसरात एका ४० वर्षीय युवकाने विषारी औषध प्राशन केल्याची घटना शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी घडली. या घटनेत उल्हास जुलालसिंग चव्हाण (वय ४०, रा. श्रीरामनगर, मुर्तीजापूर) याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. याप्रकरणी मुर्तीजापूर ग्रामीण पोलिसांनी मर्ग क्रमांक ३०/२६, कलम १९४ BNSS अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उल्हास चव्हाण हा सिरसो शेतशिवारातील वानखडे यांच्या वाडीत गेला होता. दरम्यान, तेथे त्याने विषारी औषध प्राशन केले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वाडी परिसरात काम करणाऱ्या शब्बीर नामक व्यक्तीने उल्हासच्या आई शोभा शिवदास सोळंके (वय ६२) यांना त्यांच्या घरी जाऊन माहिती दिली.माहिती मिळताच शोभा सोळंके यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी उल्हास हा शेतातील वाडीत पडलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याच्या जवळ त्याचा मुलगा व मुलगीही उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, उल्हास सकाळपासून मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत होता. त्याचा आईसोबत वाद झाला होता. आई घराबाहेर गेल्यानंतर त्याने मागील खोलीत जाऊन विषारी औषध प्राशन केल्याचे सांगण्यात आले. यानंतर कुटुंबीयांनी उल्हासला एलडीएच रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. ग्रामीण पोलिसांनी पंचनामा करून फिर्यादी शोभा शिवदास सोळंके यांच्या जबानीवरून मर्ग दाखल केला .

अकोल्याच्या अभयने पटकावला

## 'मिस्टर विदर्भ' किताब

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**अकोला** : 'मिस्टर विदर्भ' किताबावर नाव कोरत शहरातील प्रकाश आंबेडकर नगर येथीर अभय नितीन शेगोकार यांनी अकोल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. अमरावती येथे झालेल्या 'विदर्भ फेस ऑफ द इयर' स्पर्धेत विविध स्पर्धकांना मागे टाकत अभय यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची आणि आत्मविश्वासाची छाप उमटवली. बीएसएफ बहुउद्देशीय संस्था, अमरावती, सत् कबीर बहुउद्देशीय संस्था, बुलढाणा आणि पीबी फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने जाधव पॅलेस, अमरावती येथे 'विदर्भ फेस ऑफ द इयर' व 'कर्तृत्व भूषण' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार 11 कोटींची मदत

## बाधित शेतकऱ्यांना दिलासा : जून-जुलैमध्ये झाले होते पिकांचे नुकसान

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**बुलढाणा :** जून आणि जुलै २०२६ झालेल्या अतिवृष्टी, पूरस्थिती, चक्रीवादळ आणि गारपीटीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामध्ये बुलढाणा जिल्ह्यासाठी तब्बल १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपयांची सर्वाधिक मदत मंजूर झाली आहे.

जिल्ह्यातील ७ हजार ६५८ बाधित शेतकऱ्यांच्या ५ हजार ४८९.९१ हेक्टर क्षेत्रावरील पीक नुकसानीसाठी ही मदत मिळणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे



पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना मंजूर झालेली १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपयांची मदत ही राज्यासाठी मंजूर झालेल्या एकूण निधीतील मोठा हिस्सा आहे. त्यामुळे खरीप हंगामातील नुकसानीने आर्थिक अडचणीत आलेल्या हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मंजूर झालेला निधी शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी निश्चितच आधार देईल, असे मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले. अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यातील ९,६८३ बाधित शेतकऱ्यांसाठी १३ कोटी ८० लाख ७४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्ह्याला १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपये मिळणार आहेत. अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे जिल्ह्यातील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अशा परिस्थितीत ७ हजार ६५८ शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेला १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपयांचा निधी हा बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा आर्थिक आधार ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या हिताला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, नैसर्गिक आपत्तीच्या काळात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले.

**मदत कर्जखात्यात वळती करु नये - पालकमंत्री**

बाधित शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आलेली मदत डीबीटी प्रणालीद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, ही मदत रक्कम शेतकऱ्यांच्या जुन्या कर्जाच्या परतफेडीसाठी अथवा वसुलीसाठी वळती करून घेऊ नये, अशा कडक सूचना सर्व बँकांना देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना ना. मकरंद जाधव यांनी दिले आहेत.

# विषप्राशनामुळे चाळीस वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**मलकापूर :** तालुक्यातील विवरा येथील ४० वर्षीय व्यक्तीचा विषप्राशन केल्यामुळे मृत्यू झाल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उघडकीस आली.

तालुक्यातील विवरा येथील रहिवासी गजानन नामदेव सांगळकर (वय ४०) यांना त्यांच्या नातेवाईकांनी २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी उपचारासाठी मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केली असता संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. याबाबत उपजिल्हा रुग्णालयाकडून मलकापूर शहर पोलिसांना लेखी मेमो प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी कायमी मर्ग क्रमांक ५०/२०२६, कलम १९४ बीएनएसएस अन्वये नोंद केली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक निंबोळकर करीत आहेत.

# टॉप क्लास स्कूल एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना

## 31 ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**बुलढाणा :** इयत्ता ९ वीव ११ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या इतर मागासवर्गीय (OBC), आर्थिकदृष्ट्या मागास (EBC) आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती (DNT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'टॉप क्लास स्कूल एज्युकेशन' शिष्यवृत्ती योजना सन २०२६-२७ साठी सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ केवळ इयत्ता ९ वी आणि ११ वीमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना मिळणार आहे. अर्जासाठी जात प्रमाणपत्र (OBC/EBC/DNT), वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपर्यंत असल्याचे उत्पन्न प्रमाणपत्र, मागील इयत्तेचे गुणपत्रक, शाळेचे प्रवेश किंवा अभ्यास प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक पासबुकची प्रत आणि पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केल्यानंतर संबंधित शाळेच्या इन्स्टिट्यूट नोडल ऑफिसर (INO) यांना अर्जाची माहिती देणे आवश्यक आहे, जेणेकरून शाळेकडून अर्जाची ऑनलाईन पडताळणी वेळेत पूर्ण करता येईल.

सन २०२६-२७ साठी योजनेचा प्रारंभ १ जून २०२६ रोजी झाला असून, ३१ ऑक्टोबर ही अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. त्रुटी असलेल्या अर्जाची तसेच संस्थेमार्फत पडताळणीची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर तर जिल्हा, राज्य व मंत्रालय स्तरावरील पडताळणीची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर आहे. पात्र विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर वेळेत अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बस-टिप्परची समोरासमोर धडक; चालक ठार

## बोरगाव वसू फाट्यानजीक अपघात; केबिनचा चुराडा

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**चिखली :** खामगाव मार्गावरील बोरगाव वसू फाट्यानजीक एसटी बस आणि टिप्परची समोरासमोर धडक होऊन टिप्परचालकाचा मृत्यू झाला. शुक्रवारी घडलेल्या या अपघातात टिप्परच्या केबिनचा अक्षरशः चुराडा झाला. या अपघातात बसमधीलही काही प्रवाशी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. प्राथमिक माहितीनुसार, एमएच १४ एमटी ९९३८ क्रमांकाची एसटी बस छत्रपती संभाजीनगर येथून देऊळगाव राजा, जालना, चिखली आणि खामगाव मार्गे अकोल्याकडे जात होती. बोरगाव वसू फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एमएच २८ एबी ८२२८ क्रमांकाच्या टिप्परशी बसची जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता एवढी होती की, टिप्परचा दर्शनी भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. चालक सचिन वाघ (रा. संभाजीनगर, चिखली) हा चक्काचूर झालेल्या केबिनमध्ये अडकला. या अपघातात त्याचा मृत्यू झाला. टिप्पर बाळू जाधव (रा. हातणी) यांच्या मालकीचा असल्याची प्राथमिक माहिती आहे.

टिप्परच्या केबिनमध्ये अडकला चालक धडके नंतर टिप्परच्या केबिनचा मधला भाग फाटल्या सारखा झाला होता. त्यामध्ये चालक अडकल्याने त्याला बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिक आणि आपत्कालीन यंत्रणेला प्रयत्न करावे लागले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सय्यद साहिल यांनीही घटनास्थळी पोहोचून मदतकार्यात सहभाग घेतला. त्यानंतर पोलिस आणि आपत्कालीन पथकाने घटना स्थळावरील कार्यवाही हाती घेतली.

**अद्याप अस्पष्ट अपघाताचे कारण**

बाळू खेडकर या छत्रपती संभाजीनगर आगारातील चालकाच्या ताब्यात होती. दोन्ही वाहनांची धडक नेमकी कशी झाली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाहनांची स्थिती, रस्त्यावरील परिस्थिती आणि प्रत्यक्षदर्शींच्या माहितीतून अपघाताची दिशा निश्चित केली जाणार आहे. अपघातामुळे मार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला

# टपरीतील 2 लाखाच्या साहित्याचे नुकसान प्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने 6 जणांविरुध्द गुन्हा दाखल

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**खामगाव :** स्थानिक गोपाळ नगर कडुन घाटपुरी बायपासला जोडणाऱ्या रस्त्याच्या टोकावरील खुल्या जागेत कौशिक चिंतामण भेरडे (वय ३६, रा. गोपाळ नगर) यांची टपरी आहे. ६ जुलै २५ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास नितीन ज्ञानदेव पाटील (वय अं. ५५, रा. विठ्ठल नगर), ज्ञानेश्वर विश्वनाथ अढाव (वय अं.४९, रा. महावीर नगर), सुनिल साहेबराव गोंड (वय ४४, रा. कोथळी इब्राहिमपुर ता. मोताळा) व इतर ३ अनोळखी इसमांनी टपरीच्या कारणावरून संगनमत करून टपरी मधील साहित्याचे सुमारे २ लाखाचे नुकसान केले. तसेच काही साहित्य बळजबरीने गहाळ केले व दुकानातील साहित्य बंदीस्त केले. तर कौशिक भेरडे यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी कौशिक भेरडे यांनी वि.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट खामगाव यांचे न्यायालयात कि. फौ. अर्ज क्र. ९३/२०२६ दाखल करून दाद मागीतली होती. न्यायालयाच्या आदेशाने आज २८ ऑगस्ट २६ रोजी शिवाजी नगर पोस्टेला उपरोक्त आरोपींविरूध्द कलम १२५, ३०३, ३२४, ३५१, ३ (५) भान्यासं नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास एपीआय योगेश खटाणे करीत आहेत.

# शेगावातील जुन्या चिंचोली रोडवर सांडपाणी; नागरिक त्रस्त

## रस्ता दुरुस्ती, सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याची मागणी

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**शेगाव :** शहरातील जुन्या चिंचोली रोड ची तातडीने दुरुस्ती करून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे २७ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे केली आहे. या समस्यांवर १५ दिवसांत कार्यवाही न झाल्यास लोकशाही आंदोलन मार्गाने करण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

जुन्या चिंचोली रोडची मागील काही दिवसांपासून दुरवस्था झाली आहे. भूमिगत गटार योजनेच्या कामासाठी नगर परिषदेने हा रस्ता खोदला होता.

या कामाला दीड ते दोन वर्षाचा कालावधी उलटला असून, रस्त्यावरील चेंबरचे काम पूर्ण होऊनही नऊ ते दहा महिने झाले आहेत. मात्र, अद्याप रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रोहिदास नगर, नालंदा कॉलनी, सरस्वती विहार, सावरगाव नगर यांसह परिसरातील विविध वसाहतींमधील सांडपाणी पाटील यांच्या शेता जवळील नाल्यात जमा होते. सांडपाण्याची योग्य विल्हेवाट होत नसल्याने ते रस्त्यावर साचत आहे.त्यामुळे परिसरात दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सांडपाण्यामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. दुचाकीवरून पडल्याने एका महिलेच्या पायाला फॅक्चर झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची या मार्गावर मोठी वर्दळ असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. याशिवाय, रस्त्यालगत मृत पाळीव प्राणी व जनावरे टाकण्यात येत असल्याने दुर्गंधीत आणखी भर पडत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढत

# खिश्यातून पैसे काढून युवकास मारहाण

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**खामगाव :** खामगाव स्थानिक हंस कॉटन मार्केट जवळ काल २७ ऑगस्ट २६ रोजी सायंकाळी ६ ते ६.३० वाजेदरम्यान रोशन बाळु गवळी (वय २१ वर्ष, रा. खुटपुरी) याला अक्षय इटे व रितीक बहुनिया या दोघांनी संगनमत करून पैश्यांची मागणी केली. रोशन गवळी याने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे चिडून दोघांनी त्याला चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. व बळजबरीने त्याच्या पँटच्या खिश्यातुन १२०० रू. काढुन घेतले व त्याच्या दुचाकीची तोडफोड करून २५०० रूपयांचे नुकसान केले. याप्रकरणी रोशन गवळी यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त दोघांविरूध्द कलम ३०९ (४), ३२४ (२), ३ (५) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ. रामेश्वर फासे करीत आहेत.

# पैशांसाठी तरुणाला मारहाण; 1200 रुपये हिसकावले, दुचाकीची तोडफोड

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**खामगाव :** हंस कॉटन मार्केट जवळ पैशांची मागणी करून तरुणाला मारहाण करत त्याच्या खिशातील १२०० रुपये बळजबरीने काढून घेतल्याची घटना घडली. याप्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी रोशन बाळू गवळी (२१) रा. खुटपुरी, ता. खामगाव यांच्या तक्रारीनुसार, दि. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते ६.३० वाजेदरम्यान हंस कॉटन मार्केट जवळ आरोपी अक्षय इटे व रितिक बहुनिया, दोन्ही रा. खामगाव, यांनी त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांनी चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या पॅन्टच्या डाव्या खिशातून १२०० रुपये बळजबरीने काढून घेतले. तसेच त्यांच्या मोटारसायकलची तोडफोड करुन २,५०० रुपयांचे नुकसान केल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादी च्या तोंडी रिपोर्ट वरून खामगाव शहर पोलीस ठाण्यात कलम ३०९ (४), ३२४(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# दारूसाठी पैसे न दिल्याने तरुणाला मारहाण

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**खामगाव :** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एका तरुणाला शिवीगाळ करून चापट-बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता चांदमारी परिसरातील दहा नंबर शाळेसमोर घडली. याप्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी जातीय एनसी दाखल केली आहे. शेख समीर शेख सलीम (२५) रा. फुकटपुरा, चांदमारी, खामगाव हे बाजारात जात असताना अक्षय इटे (२४) व रितीक बहुनीया (२२) यांनी त्यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांनी शिवीगाळ करत समीर यांना डोक्यावर व पाठीवर चापट-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लोटापोट केल्याने ते खाली पडून त्यांच्या पाठीला खरचटल्याचे तक्रारीत नमूद आहे. यावेळी त्यांना जिवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात कायमी जातीय एनसी क्रमांक ३५०/२०२६, कलम ११५ (२), ३५२, ३५१(२), ३(५) बी एन एस अन्वये नोंद करण्यात आली. अर्जदाराला न्यायालयात दाद मागण्या बाबत समज देण्यात आली असून, वरिष्ठांच्या आदेशाने पुढील चौकशीची जबाबदारी पो हेकों रामेश्वर फासे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

# मलकापुरात दोन बस अडवून काचा फोडून 85 हजाराचे नुकसान

## बस चालकास ही काठीने मारहाण;शहर पो.स्टेत गुन्हा दाखल

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**मलकापुर:** शहरातील मुक्ताईनगर रोडवरील कोलते इंजिनिअरिंग कॉलेजजवळ एका इसमाने धुमाकूळ घालत राज्य परिवहन महामंडळाच्या दोन बसेसची तोडफोड करीत बस चालकाला काठीने मारहाण केल्याची घटना दि. २७ ऑगस्ट रोजी दुपारी १२.५० वा. दरम्यान घडली. यामध्ये महामंडळाचे ८५ हजार रुपयांचे नुकसान झाले. याबाबत शहर पो.स्टे.ला दिलेल्या तक्रारीवरून आरोपी विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बस चालक संजय भास्कर कांबे (वय ३२) रा.गजानन नगर, मलकापूर हे वाहक संदीप देशमुख यांच्यासह बस क्रमांक एम.एच १४ बी.टी ३३२४ घेऊन झोडगा येथून मलकापूरकडे येत होते. दुपारी १२:५० वाजेच्या सुमारास कोलते कॉलेजजवळ आरोपी संजय भगवान गवई (वय ४०) रा. चिंचोल, ह.मु. म्हाडा कॉलनी, मलकापूर याने आपली मोटारसायकल बससमोर आडवी लावून रस्ता अडवला. तसेच काहीही कारण नसताना आरोपीने सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करून व दहशत गर्दी करण्याच्या उद्देशाने शिविगाळ करत हातातील काठीने बसची समोरची काच आणि उजव्या बाजूच्या दोन काचा फोडून सुमारे ४० हजार रुपयांचे नुकसान केले. याबाबत चालकाने काच का फोडली असा जाब विचारला असता, आरोपीने चालक संजय कांबे यांच्या उजव्या पायावर काठीने मारहाण केली व वाहकालाही लोटपाट करत पुन्हा या रस्त्याने बस आणल्यास जीवाने मारून टाकेन अशी धमकी दिली. त्याच दरम्यान मलकापूरकडून खामगाव आगाराची शेगाव ते शिर्डी ही बस क्र. एम.एच १४ एल.एक्स ४४६४ चे चालक गणेश ज्ञानदेव चेडाळणे मुक्ताईनगरकडे जात असताना आरोपीने ती बसही अडवून काठीने समोरची काच फोडली अन् ४५ हजार रुपयांचे नुकसान केले. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला आरोपी संजय भगवान गवई याच्याविरुध्द दिलेल्या तक्रारीवरून अप.क्र. ६२३/२०२६, कलम १३२, १२१ (१), २२१, ११८(१), ३५२, ११५ (२), ३२४ (४), १२६ (२) बीएनएसएस, सहकलम ७ गुन्हेगारी कायदा सुधारणा अधिनियम १९३२, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव हे करीत आहेत.

# गणेशोत्सवात तात्पुरत्या वीज जोडणीसाठी घरबसल्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेची सुविधा

## महावितरणचे सार्वजनिक मंडळांना आवाहन

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**खामगाव :** यंदाचा गणेशोत्सव निर्विघ्न, आनंदात आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी वीज सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. उत्सवाच्या कालावधीसाठी केवळ अधिकृत तात्पुरती वीजजोडणी घ्यावी, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. आबालवृद्धांचा लाडका गणेशोत्सव येत्या १४ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. त्यासाठी शहरासह ग्रामीण भागातील गणेश मंडळांची तयारी सुरू झाली आहे.

मंडप, रोषणाई आणि विविध विद्युत सजावटीची कामे करताना सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी मंडळांनी मंडपातील संपूर्ण विद्युत वायरिंग, स्विच, प्लग, फ्यूज तसेच रोषणाईच्या जोडण्यांची तपासणी करून घ्यावी. खराब किंवा



तुटलेल्या वायरचा वापर टाळावा. एका जोडणीवर क्षमतेपेक्षा जास्त विद्युत उपकरणे जोडू नयेत. वायरिंग जमिनीवर उघडी ठेवण्याऐवजी ती सुरक्षित पद्धतीने लावावी. मंडपातील विद्युत व्यवस्था सुरू करण्यापूर्वी पात्र वीज तज्ज्ञाकडून तपासणी करून घेणे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**मिरवणुकीदरम्यान काळजी घेण्याचा सल्ला**

गणेशमूर्तीच्या आगमन व विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील वीजवाहिन्यांची उंची लक्षात घेऊन मूर्तीची उंची आणि रथाची रचना निश्चित करावी. मिरवणुकीदरम्यान वीजवाहिन्यांना मूर्ती, रथ किंवा सजावटीचा स्पर्श होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. तसेच शक्यतो सौरऊर्जेवर चालणारी यंत्रणा आणि एलईडी दिव्यांचा वापर करून वीज बचतीचा संदेश द्यावा, असेही महावितरणने सुचविले आहे.

**काळजी घेण्याची गरज**

मंडप उभारताना जवळून जाणाऱ्या वीजवाहिन्या आणि वीज खांबांची विशेष काळजी घ्यावी. मंडपाची लोखंडी रचना, पत्रे किंवा सजावटीचे साहित्य वीज वाहिन्यांच्या संपर्कात येणार नाही, याची दक्षता घ्यावी. रोषणाईची वायरिंग सुरक्षित पद्धतीने करून विद्युत उपकरणांवर अतिरिक्त भार पडणार नाही, याचीही काळजी घ्यावी. आपत्कालीन प्रसंगी वीजपुरवठा त्वरित बंद करा

रोषणाई किंवा विद्युत उपकरणां मुळे धूर, ठिणगी, शॉर्ट सर्किट किंवा आग लागल्याचे लक्षात आल्यास घाबरून न जाता प्रथम संबंधित विद्युत जोडणी बंद करावी. ओल्या हाताने विद्युत उपकरणांना स्पर्श करू नये. विजेचा धक्का लागलेल्या व्यक्तीला थेट हाताने स्पर्श न करता सुरक्षित पद्धतीने विद्युत संपर्कापासून दूर करावे आणि तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. मंडपात अग्निशामक यंत्रणा व प्रथमोपचाराची सुविधा सज्ज ठेवणेही आवश्यक आहे.

अधिकृत जोडणीच घ्या<गणेशोत्सव मंडळांनी रोषणाई किंवा अन्य विद्युत उपकरणांसाठी अनधिकृतपणे वीजजोडणी घेऊ नये. अनधिकृत जोडणीमुळे वीजगळती, शॉर्टसर्किट, विजेचा धक्का तसेच आग लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अधिकृत तात्पुरती वीजजोडणी घेणे आवश्यक आहे

# बेलाडमध्ये अवैध दारुविरुद्ध पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**मलकापूर :** तालुक्यातील बेलाड येथे अवैधरित्या देशी दारूची विक्री व बाळगणाऱ्या व्यक्तींविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत देशी दारू जप्त करण्यात आल्या असून संबंधित व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.२० वाजता बेलाड बसस्थानक परिसरातील सार्वजनिक ठिकाणी पोलिसांनी कारवाई केली. पंचांसमक्ष झडती घेतली असता च्संत्रा ५०००ज् कंपनीच्या ९० एमएल क्षमतेच्या १६ शिश्या आढळून आल्या. प्रत्येकी ४० रुपये किमतीच्या या दारूची एकूण किंमत ६४० रुपये असून ती पोलिसांनी जप्त केली. या प्रकरणी रामेश्वर जनार्दन संबारे (वय ६०, रा. बेलाड, ता. मलकापूर) याच्याविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात अप. क्र. ६२४/२०२६, कलम ६५(ई), महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याचप्रमाणे बेलाड परिसरात अवैध देशी दारूविरुद्ध करण्यात आलेल्या दुसऱ्या कारवाईतही ९० एमएलच्या १६ शिश्या जप्त करण्यात आल्या. दोन्ही कारवायांमध्ये पोलिसांनी देशी दारू व अन्य मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पोलीस कर्मचारी रहीमखान हमीदखान पठाण यांनी फिर्याद दिली. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक बेले करीत असून मलकापूर शहर पोलिसांकडून अवैध दारूविरुद्ध कारवाई सुरू आहे.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी २९ ऑगस्ट

**खामगाव :** तालुक्यातील मांडका येथील रहिवासी निखील अभिमन्यु खंडारे (२५) या तरूणाने घरातील छताच्या हुकाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज २८ ऑगस्ट २६ रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी वामन विष्णाजी खंडारे यांनी पिं. राजा पोस्टेला दिलेल्या फिर्यादीवरून कलम १९४ भानासुसं नुसार मर्ग दाखल केला आहे. पुढील तपासतपास पोहेकॉ. एकनाथ बांदे करीत आहेत.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135